# खाद्यतेलाच्या उत्पादनातील भारताचे परावलंबित्व कधी संपणार?

हरितक्रांती होऊन बराच काळ लोटला. अन्नधान्याच्या बाबतीतले परालंबित्व कमी झाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अन्नधान्याचे उत्पादन पाच पटीने वाढले. परंतु आजही आपला देश खाद्यतेलाच्या बाबतीत परावलंबी आहे. १३८ कोटी लोकसंख्या असलेल्या देशामध्ये दरवर्षी २५० लाख टन खाद्यतेलाचा वापर केला जातो. यापैकी आपण फक्त १०५ लाख टनांपर्यंत तेलाचे उत्पादन करतो; तर दरवर्षी १४५ लाख टनांपर्यंत खाद्यतेलाची आयात केली जाते. यासाठी आपण दरवर्षी ६८,००० कोटी रुपयांचे परकीय चलन खर्च करत असतो. एकूण नऊ प्रकारच्या पिकांपासून खाद्यतेल तयार करून त्याचा वापर होत असला तरी मोहरी, सोयाबीन, भुईमूग, सूर्यफूल आणि पामतेलाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

देशामध्ये २७ लाख टन मोहरी, १९ लाख टन सोयाबीन, १२ लाख टन भुईमूग, ३ लाख टन पामतेल आणि ६०,००० टन सूर्यफुलाचे तेल उत्पादन होते. दरवर्षी ३२ लाख टन सोयाबीन, ८५ लाख टन पामतेल तर २५ लाख टन सूर्यफुलाच्या तेलाची आयात केली जाते. सोयाबीन तेलाची आयात अर्जेंटिनामधून केली जाते. सूर्यफूल तेलाची आयात युक्रेन, रशिया, अर्जेंटिना या देशांतून केली जाते तर पामतेल इंडोनेशिया, मलेशिया या देशांतून आयात केले जाते. रशिया– युक्रेनमध्ये युद्ध सुरू झाले आणि सूर्यफूल तेलाची आयात बंद झाली. परिणामी खाद्यतेलाचा पुरवठा कमी झाल्यामुळे खाद्यतेलाच्या किंमतीमध्ये ३० ते ४० टक्के वाढ झाली. म्हणजेच देशातील खाद्यतेलाच्या किंमती स्थिर राखण्यासाठी जगातील विविध घटना कारणीभूत असतात. तेल उत्पादक देशात दुष्काळ पडला, महापूर आला उत्पादन कमी झाले किंवा सध्याची युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली की त्याचा किंमतीवर परिणाम होतो. देशातील वाढती लोकसंख्या, खाद्यसंस्कृती आणि आर्थिक सुबत्ता यामुळे तेलाच्या मागणीमध्ये दरवर्षी ६ टक्के वाढ होत असताना तेलाचे उत्पादन मात्र फक्त २ टक्के वाढले, किंबहुना ते स्थिरच म्हटले पाहिजे.



**भारत खाद्यतेलाचा प्रथम क्रमांकाचा 'आयातदार'**

भारत जगामध्ये अमेरिका, चीन, ब्राझीलनंतर चौथ्या क्रमांकाचा खाद्यतेल उत्पादक देश असला; तरी जगामध्ये खाद्यतेलाची आयात करणारा प्रथम क्रमांकाचा देश आहे, ही नक्कीच विचार करायला लावणारी बाब आहे. भारतामध्ये एकूण २५० लाख हेक्टर क्षेत्रावर तेलबियांचे पीक घेतले जाते आणि तेलबियांचे उत्पादन ३२० लाख टन आहे. देशातील सरासरी तेलबिया उत्पादन १२६५ किलो प्रतिहेक्टरी आहे, जे जगाच्या सरासरी उत्पादनाच्या तुलनेने फक्त ५० टक्के आहे. महाराष्ट्राची परिस्थिती तर फारच वाईट आहे. ३८.०६ लाख हेक्टर क्षेत्रावर तेलबियांचे उत्पादन घेतले जाते आणि उत्पादकता फक्त ११०१ किलो प्रतिहेक्टर आहे. यात मराठवाडा विभाग आघाडीवर असून १४.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर तेलबियांचे उत्पादन घेतले जाते. परंतु हेक्टरी उत्पादकता फक्त ३१७ किलो असल्यामुळे तेलबियांचे उत्पादन मात्र फक्त ४.४३ लाख टन मिळते. महाराष्ट्र सोयाबीन पिकामध्ये आघाडीवर असून, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र या दोन राज्यांत ८० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. मोहरी उत्पादनात राजस्थान तर भुईमुगाच्या उत्पादनात गुजरात अग्रेसर आहे. सूर्यफुलाच्या उत्पादनामध्ये कर्नाटक, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, पश्चिम बंगाल आणि बिहार ही राज्ये आघाडीवर आहेत. शासन पामतेल उत्पादनाला प्रोत्साहन देत असले तरी त्याचे उत्पादन मात्र काही भागांमध्येच सुरू झालेले आहे. पंजाबसारख्या राज्याचे तेलबिया उत्पादन १५८७ किलो प्रतिहेक्टरी म्हणजे सर्वात जास्त असले तरीही, त्या राज्यात तेलबियांपेक्षा गहू आणि भातालाच जास्त प्राधान्य दिले जाते. देशामध्ये सोयाबीन, मोहरी,

भुईमूग, पामतेल आणि सूर्यफूल तेलाचा वापर जवळपास ९० टक्के आहे.

**पामतेलाची मागणी सातत्याने वाढतेय**

सूर्यफुलाचे तेल आरोग्यासाठी विशेषत: हृदयाच्या आरोग्यासाठी तसेच मधुमेहींसाठी चांगले आहे. परिणामी या तेलाची मोठ्या प्रमाणात मागणी असल्यामुळे त्याची आयात केली जाते. एकूण सूर्यफूल तेलाच्या आयातीपैकी ९० टक्के आयात रशिया आणि युक्रेन या देशांतून केली जाते. एकूण तेलाच्या आयातीपैकी सूर्यफूल आयात १४ टक्के होत असते. पामतेल सर्वात स्वस्त आणि सर्वांना आर्थिकदृष्ट्या परवडेल या दरामध्ये उपलब्ध असल्यामुळे पाम तेलाचा मोठ्या प्रमाणात वापर हातो. पामतेलाची साठवण क्षमता अधिक असून ते इतर तेलांमध्ये सहज मिसळता येते. तसेच या तेलामध्ये पदार्थ अनेक वेळा तळता येत असल्यामुळे ते हॉटेल, रेस्टॉरंट तसेच लहान व्यावसायिकांच्या आवडीचे खाद्यतेल आहे. पाम तेलाचे देशांतर्गत अतिशय कमी उत्पादन असले तरी या तेलाचा वापर ३७ टक्के म्हणजे सर्वात जास्त आहे. यामुळेच या खाद्यतेलाची दरवर्षी ८० लाख टनांपर्यंत आयात इंडोनेशिया, मलेशिया या देशांतून केली जाते. म्हणजेच एकण आयातीपैकी जवळ जवळ ५४ टक्के खाद्यतेल या दोन देशांतून आयात केले जाते. या देशांनीही पामतेलाचे निर्यातमूल्य तसेच निर्यात करामध्ये वाढ केल्यामुळे या तेलाच्या किंमती वाढल्या आहेत. भविष्यात या देशांनी पामतेलाच्या उत्पादनासंदर्भात काही वेगळा निर्णय घेतला किंवा निर्बंध लादले तर याचा फार मोठा परिणाम भारतातील तेलाच्या किंमतीवर होऊ शकतो.

भारतात दरवर्षी प्रतिमाणशी १९.५ किलो खाद्यतेलाचा वापर होतो. दरवर्षी वाढणारी लोकसंख्या आणि खाद्यतेलाचा वाढता वापर याचा विचार करता पुढील चार वर्षात खाद्यतेलाचा वापर १७ टक्के वाढणार आहे. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. इंधनाच्या आयातीवर लाखो कोटी रुपयांचा पडत असलेला बोजा तसेच अशाश्वत पुरवठा आणि जागतिक दरामध्ये होणारे चढउतार यामुळे इंधनाची स्थिती गंभीर होते. याचा विचार करून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन दिल्यामुळे आज आपला देश पेट्रोलमध्ये १० टक्क्यांपेक्षा जास्त इथेनॉल मिसळण्यात यशस्वी झाला आहे आणि पुढील काही वर्षांत याचे प्रमाण २० ते २५ टक्क्यांपर्यंत जाईल, अशी खात्री आहे. यासाठी मागील दशकामध्ये प्रयत्न झाले व त्यात चांगले यश आले. याचप्रमाणे देशांतर्गत खाद्यतेलाच्या उत्पादन वाढीसाठी तसेच खाद्यतेलाचे परावलंबित्व कमी करण्यासाठी देशामध्ये मोठ्या प्रमाणात खाद्यतेल निर्मितीसाठी प्रयत्न करावे लागतील. असे झाले नाही तर युक्रेन- रशिया, इंडोनेशिया- मलेशिया, अर्जेंटिना या देशांपुढे खाद्यतेलासाठी हात पसरण्याची वेळ येईल. भारतासारख्या बलाढ्य, कृषिप्रधान देशासमोर अशी वेळ येणे ही नक्कीच अभिमानाची बाब नाही!

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)** ■

## लेखकांना आवाहन...

**‘पूर्वा कृषिदूत’** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**– संपादक, ‘पूर्वा कृषिदूत’**